# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे “आयडॉल्स”

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “कृषि पदवीधर आयडॉल”

### श्री. किशोर श्रीराम राजहंस

कृषि उद्योजक, एम.एस्सी. (कृषि), कृषि महाविद्यालय, पुणे

के. एफ. बायोप्लांटस् प्रा. लि., सर्व्हे नं. १२९/१ ते ३ सी, मांजरी (बुद्रुक), ता. हवेली, जि. पुणे



संपर्क क्रं. : ९८२२०९१५८२

**कृषि उद्योगांची माहिती**

- के. एफ. बायोप्लांटस् प्रा. लि., पुणे
- भारतातील सर्वात मोठी प्लांट बायोटेक कंपनी
- भारतात तसेच जगभरातील ३० पेक्षा जास्त देशांमध्ये कंपनी दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष रोपे पुरविते

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**

- २० हजार चौ.मी. क्षेत्रावर अत्याधुनिक प्रयोगशाळा
- एकाचवेळी ३० दशलक्ष रोपे ठेवण्याची क्षमता असलेल्या रोपांच्या वाढीसाठी संपूर्णपणे नियंत्रीत असलेल्या ४२ रुम्स
- इन-व्हिट्रो उत्पादनानंतर उच्च दर्जाची रोपे तयार करण्यासाठी अत्याधुनिक फर्टीगेशन प्रणालीसह ६.५ हे. मध्ये पूर्णपणे नियंत्रित हरितगृहे
- १३०० पेक्षा जास्त उच्च प्रशिक्षित तंत्रज्ञ
- संसर्ग टाळण्यासाठी झाडांना १०० टक्के निर्जंतुक वातावरण तयार करण्यासाठी अंगभूत सुरक्षा उपाय
- दोषरहीत अचुकता सुनिश्चित करण्यासाठी संगणकीकृत ई.आर.पी. प्रणाली
- कोल्ड स्टोरेज युनिट्स आणि तापमान नियंत्रित व्हॅन्ससह सुसज्य अशी जागतिक दर्जाची मालवाहतुक सुविधा

**वार्षिक उलाढाल :** रु. २४७ कोटी

**यावसायीक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- रोटरी क्लब ऑफ पुणे व्हायब्रंट इस्ट यांचे सदस्य तसेच एक रोटेरियन या नात्याने अनेक सामाजिक कार्यात सहभाग
- विद्यार्थी सहाय्यक समिती सदस्य : या समितीव्दारे शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना निवास/भोजन इ. साठी आवश्यक ती मदत देणे. दरवर्षी २ विद्यार्थ्यांचे शिक्षण व भोजनाचा खर्च उचलने

**पुरस्कार**

- माजी पंतप्रधान कै. चंद्रशेखर यांच्या हस्ते सन्मान (२००३)
- कृषि जैव तंत्रज्ञान उद्योगातील उल्लेखनीय कारकिर्दीबद्दल ॲग्रोवर्ल्ड कृषि जीवन गौरव पुरस्कार - २०१५
- रोझ सोसायटी ऑफ पुणे यांच्यातर्फे गुलाब मित्र पुरस्कार - २०१७
- मिडीया टुडे ग्रुपव्दारे भारतातील ‘फ्लावर्स ॲण्ड प्लांट’ इंडस्ट्रीमध्ये भरीव योगदानासाठी एक्सलन्स ॲवार्डने सन्मानित - २०१८


**आर्थिक प्रगती व रोजगार निर्मिती**

- कंपनीमध्ये एकूण १६०० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत










## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “शेतकरी आयडॉल”

### श्री. उदयकुमार हणमंतराव गायकवाड
### सौ. उर्मिला उदयकुमार गायकवाड

मु. पो. वाठार किरोली, ता. कोरेगाव, जि. सातारा



संपर्क क्रं.: ९४०३६८६०१४

**शिक्षण** : पशुधन पदविका

**जमीनधारणा क्षेत्र** : ९ एकर

**सध्या घेत असलेली पिके** : ऊस, आले, ज्वारी, हरभरा, हिरवळीची पिके (ताग, धैंचा)

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

- महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेले ऊस को. ८६०३२ या वाणाचा नियमित वापर व उत्पादन
- लागणीच्या उसामध्ये उसाचा पाला काढून सरीमध्ये पसरला जातो, यामुळे नैसर्गिक आच्छादन मिळून पाण्याची बचत, तण व्यवस्थापन तसेच मुलस्थानी सेंद्रिय खत तयार होते
- विद्यापीठाने शिफारशीत केल्यानुसार ऊस तुटल्यानंतर खोडवा पीक घेण्यासाठी रटून मॅनेजर यंत्राच्या सहाय्याने बुडखे जमिनीलगत छाटून घेतले जातात, पाचट सरीमध्ये बारीक करून पसरले जाते तसेच सोबत खतांचा पहिला हप्ता माती आड करुन दिला जातो
- आंतरमशागतीसाठी पॉवर टिलरचा वापर केला जातो
- पीक फेरपालट म्हणून ज्वारी व हरभरा लागवड, शेतीमध्ये दर तीन वर्षांनी ताग व धेंचा या हिरवळीच्या खतांचा वापर
- संपूर्ण क्षेत्रावर सुक्ष्म सिंचन पद्धतीने पाणी व खत व्यवस्थापन, जीवाणू खते, द्रवरूप खतांचा व सुक्ष्म अन्नद्रव्याचा वापर, संपूर्ण शेती यांत्रिकीकरणाच्या अंतर्गत ट्रक्टरच्या सहाय्याने मशागत व व्यवस्थापन, साडेचार फुटी सरीवर लागण, आडसाली हंगामात जास्तीत जास्त लागण
- सातत्याने पाचट व्यवस्थापन केल्यामुळे माळरानावर देखील एकरी शंभर टनांपेक्षा जास्त ऊस उत्पादन घेण्यात यश

**तंत्रज्ञानाचा प्रसार**



- वैयक्तिक तसेच समुहामार्फत पाचट व्यवस्थापन व सुक्ष्म सिंचन पद्धतीने पाणी व खत व्यवस्थापन या दोन महत्वाच्या तंत्रज्ञानाचा प्रसार केल्यामुळे गावातील जवळपास ७० % पेक्षा जास्त क्षेत्रावरील शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करीत आहे.

**वार्षिक उत्पन्न :** रु. १० लाख







## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

फेब्रुवारी,२०२३